ePaper
सीजफायरचं उल्लंघन..! काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला भडकले

| वर्ष - 8 | अंक - 278 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

www.mahaenews.com | रविवार, दि. 11 मे 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- कोहलीला निवृत्त व्हायचं आहे का?
- स्पर्धा स्थगित करण्यात आलेली नाही
- तर हा रक्तपात थांबला असता!
- अमेरिकेच्या मध्यस्थीनंतर शस्त्रविराम?



## पाकचे घालीन लोटांगण, वंदीन भारताचे चरण !

# युद्धविराम!

## भारताची ताकद दिसली ; 12 तारखेला भारत सांगेल त्या अटींवर हतबल पाकडे स्वाक्षरी करणार !

। नवी दिल्ली / इस्लामाबाद / वॉशिंग्टन । प्रतिनिधी । महाईन्यूज

**गेल्या तीन-चार दिवसांपासून भारत आणि पाकिस्तान यांच्यात सुरू असलेली युद्धाची घुमशान अखेर शनिवारी सायंकाळी पाच वाजता थंडावली. या काळात भारताची युद्धनीती, अचूकता आणि नियोजनबद्धता पाकड्यांच्या लक्षात आली.**




### भारताच्या सर्व अटी मान्य..

हे युद्ध म्हणजे भारताचे काहीही नुकसान होत नाही आणि फक्त पाकिस्तानचे कंबरडे मोडत आहे, विमाने कोसळत आहेत, क्षेपणास्त्रे आणि ड्रोन पाडले जात आहेत, दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त होत आहेत आणि भारताची ताकद एवढी आहे, की पाकिस्तान सोडून सर्व राजकीय नेत्यांना पळून जाण्याची वेळ आली आहे, हे लक्षात येताच पाकिस्तान सरकारने थेट अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना साकडे घातले. भारत सांगेल त्या अटींवर आम्ही शरण येण्यास तयार आहोत, फक्त युद्ध थांबवा, अशी त्यांनी मागणी केली. यानंतर ट्रम्प यांनी भारतीय पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली आणि 'युद्धविराम' जाहीर केला.

## प्रचंड घुमशानीनंतर दोन्ही देशांमध्ये शस्त्रसंधी !!

### आता 12 तारखेला दुपारी फैसला !

प्रत्यक्षात, दोन्ही देशांच्या अधिकाऱ्यांमध्ये सविस्तर चर्चा होणार असून त्यात भारत ज्या अटी घालेल, त्या मान्य करण्याची तयारी पाकिस्तानने दाखवली आहे. त्यामुळे आता हा तात्पुरता युद्धविराम असून दि. १२ तारखेला अंतिम घोषणा करण्यात येईल.



### भारताच्या अटी तरी काय ?

परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्या म्हणण्यानुसार भारताने सर्वात मोठी अट ठेवली आहे ती म्हणजे कोणताही दहशतवादी हल्ला हा दोन्ही देशांमधील युद्ध समजले जाईल आणि त्याचा आम्ही नक्की बदला घेऊ, त्यावेळी कसलीही तक्रार चालणार नाही. त्याचप्रमाणे सिंधू जल करार पाळला जाणार नाही आणि आम्ही पाणी वापरणार, अशीही अट असेल.

### पाकिस्तानला वाकवण्याची संधी..

युद्धाच्या निमित्ताने चारही बाजूंनी भारताने पाकिस्तानला पूर्णपणे चेपवले असून संपूर्णपणे गुडघ्यावर रांगण्याची वेळ त्यांच्यावर आणली आहे. भारत हा अत्यंत प्रगतिशील, शस्त्रसामग्रीने सज्ज आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाने परिपूर्ण असलेला शेजारी असून त्याच्या जवळपासही पाकिस्तान पोहचणार नाही, याची खात्री पाकिस्तानला पटली आहे, त्यामुळे भारतापुढे लोटांगण घालण्याशिवाय त्यांना आता पर्याय राहिलेला नाही.

## भारताच्या हल्ल्यांतून सोडवा हो SSS ! पाकड्यांची अमेरिकेकडे धाव!

### भारताने काय काय साधले..

पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी २६ हिंदूंची हत्या केली आणि अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने भारतीय लष्कराने पाकिस्तानवर चढाई केली. पहिल्याच दिवशी नऊ ठिकाणी यशस्वी हल्ला चढवून दहशतवाद्यांची मुख्यालये जमीनदोस्त केली. त्यावेळी, डझनभर 'मोस्ट वॉन्टेड' दहशतवादी ठार मारले आणि एकूण ५०० फूट-सोल्जर ठोकले.

### जुना हिशेब चुकवला..

कंदहारपासून जुन्या हल्ल्यांतील सूत्रधारांचे आणि दहशतवाद्यांचे जुने हिशोब चुकते केले. सिंधू जल करार इतिहासजमा झाला.

### पाकची लक्तरे टांगणीवर..

या कारवाईदरम्यान पाकिस्तान सैन्याची अक्षरशः दाणादाण उडवली. त्यांच्या वायुदलाची इज्जत धुळीस मिळवली, तसेच चिनी एयर-डिफेन्स सिस्टीम, चिनी रडार, चिनी ड्रोन, चिनी मिसाईल्सची जागतिक पातळीवर नाचक्की करून टाकली.

### युद्ध शत्रूच्या भूमीवर..

युद्धनीतीचा पहिला नियम भारताने पाळला. जवळजवळ संपूर्ण युद्धच पाकिस्तानच्या भूमीवर खेळलो, म्हणजे जे झाले ते नुकसान त्यांचेच झाले. पाक मिलिटरी इन्फ्रास्ट्रक्चरला मजबूत नुकसान केले आणि भारताची युद्ध यंत्रणा जगात सर्वोत्तम आहे, हेही सर्वांना दाखवून दिले. मुख्यतः, चीनच्या ताकदीचा फुगा पण फुटला. भारतीय सेनेला आणि वायुसेनेला एकदम खराखुरा युद्धसराव करता आला. हा अनुभव प्रचंड उपयोगी पडणार आहे.

## पाकिस्तानचे नुकसान तरी किती ?


भारताशी पंगा घेणं पाकिस्तानला कितपत महाग पडलं, याची मोजदाद पाकिस्तानात सुरू आहे पाकिस्तानचं किती नुकसान झालं, याचा आकडा आता पहिल्यांदाच समोर आला आहे. पाकिस्तानचे सात एअरबेस पूर्णपणे उद्ध्वस्त झाले आहेत, यामध्ये पाच एअरबेस आणि दोन रडारचा समावेश आहे. यामध्ये नूर खान एअरबेस, रावळपिंडी एअरबेस, रहमियार खान, मुस्तफाबाद, मुरीद, रफीकुई एअरबेस यांचा समावेश आहे. एवढंच नाही तर या हल्ल्यांमध्ये पाकिस्तानी लढाऊ विमानांचं देखील मोठं नुकसान झालं आहे. अनेक ड्रोनचे लाँच पॅड देखील उद्ध्वस्त करण्यात आले आहेत. हजारो कोटी रुपयांच्या खर्चाचा पाकिस्तानला खड्डा सहन करावा लागला आहे.

# टिकायचे, तर दृष्टी स्वच्छ करून घ्या!

## चित्रपट ही एक अद्भुत जादू आहे : दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

'चित्रपट ही एक अद्भुत जादू आहे. त्याद्वारे प्रेक्षकांना दोन-तीन तास भुलवत ठेवायचे आहे. तंत्रज्ञानाच्या प्रगतीबरोबरच गेल्या तीन दशकांत समाज बदलला आहे. शिक्षण आणि जगण्याचे प्राधान्यक्रम बदलले आहेत. आता कोणीही मोबाइलवर चित्रपट, लघुपटाची निर्मिती करू शकतो. त्यामध्ये आपला मराठी किंवा प्रादेशिक चित्रपट कसा टिकणार, हा प्रश्न आहे. त्यासाठी नव्या पिढीच्या दिग्दर्शकांनी चित्रपट करण्याआधी आपली दृष्टी स्वच्छ करून घेणे आवश्यक आहे,' असे मत ज्येष्ठ दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी शनिवारी व्यक्त केले.



साधना प्रकाशनच्या वतीने मीना कर्णिक यांच्या 'आजचे मास्टर्स : जागतिक कीर्तीच्या आठ दिग्दर्शकांची ओळख' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. जब्बार पटेल यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते. प्रसिद्ध चित्रपट समीक्षक गणेश मतकरी, दिग्दर्शक निखिल महाजन आणि साधना प्रकाशनाचे संपादक विनोद शिरसाठ या वेळी उपस्थित होते.पटेल म्हणाले, 'चित्रपट हा धंदा आहे. त्यामुळे पैसे देणाऱ्याला शेवटचा रुपया मिळेल, याची दक्षता दिग्दर्शकाला घ्यावी लागते. या पुस्तकामध्ये दिग्दर्शकांचा प्रवास उलगडताना वेगळ्या पद्धतीने चित्रपटाची मांडणी आणि स्त्री संवेदनांचा सुंदर गोफ आहे. रुळलेल्या वाटा सोडून नवी वाट धुंडाळणारे दिग्दर्शक या पुस्तकात आहेत. गेल्या सात-आठ वर्षांत वेगळे वळण आले आहे. हातामध्ये मोबाइल असलेल्या ग्रामीण भागातील युवकांमध्येही चित्रपट, लघुपट निर्मितीचे धाडस आले आहे.''आपल्याकडे समीक्षा एक तर पुस्तकी पद्धतीने केली जाते किंवा आपल्याला जे वाटते त्यापलीकडे असू शकत नाही, अशी काहींची धारणा झाली आहे. त्याला हे लेखन छेद देते. वैश्विक पद्धतीचा आशय असलेल्या चित्रपटाला जागतिक चित्रपट म्हटले जाते. केवळ पडद्यावरचे काम यापेक्षाही दिग्दर्शकाची जीवनदृष्टी, जगण्यातील संघर्षाचे पडसाद जे अशा दिग्दर्शकांच्या चित्रपटात दिसतात, तेच कर्णिक यांच्या लेखनातही उमटले आहेत,' असे मतकरी म्हणाले.'वैश्विक पातळीवरही चित्रपटाचे व्याकरण एकच असते. दिग्दर्शकाचे काम गोष्ट सांगणे इतके मर्यादित नाही, तर त्याला प्रेक्षकांना काळाच्या प्रवासाबरोबर न्यायचे असते. हे पुस्तक चित्रपटांकडे पाहण्याचा वेगळा दृष्टिकोन देणारे आहे,' असे महाजन यांनी नमूद केले. कर्णिक म्हणाल्या, 'मी समीक्षक नाही. तर, मूळची पत्रकार असल्याने विषय आणि वाचक यांच्यातील पूल आहे याच भूमिकेतून हे लेखन केले आहे.'क चित्रपट कसा टिकणार, हा प्रश्न आहे. चित्रपट करण्याआधी आपली दृष्टी स्वच्छ करून घेणे आवश्यक आहे,' असे मत ज्येष्ठ दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी शनिवारी व्यक्त केले.

### चित्रपट कसा टिकणार, हा प्रश्न

साधना प्रकाशनच्या वतीने मीना कर्णिक यांच्या 'आजचे मास्टर्स : जागतिक कीर्तीच्या आठ दिग्दर्शकांची ओळख' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. जब्बार पटेल यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते. प्रसिद्ध चित्रपट समीक्षक गणेश मतकरी, दिग्दर्शक निखिल महाजन आणि साधना प्रकाशनाचे संपादक विनोद शिरसाठ या वेळी उपस्थित होते.पटेल म्हणाले, 'चित्रपट हा धंदा आहे. त्यामुळे पैसे देणाऱ्याला शेवटचा रुपया मिळेल, याची दक्षता दिग्दर्शकाला घ्यावी लागते. या पुस्तकामध्ये दिग्दर्शकांचा प्रवास उलगडताना वेगळ्या पद्धतीने चित्रपटाची मांडणी आणि स्त्री संवेदनांचा सुंदर गोफ आहे. रुळलेल्या वाटा सोडून नवी वाट धुंडाळणारे दिग्दर्शक या पुस्तकात आहेत.

# सायबर चोरट्यांकडून लाखो रुपयांना गंडा

## ऑनलाइन कामाचे आमिष दाखवून फसवणूक

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

'घरातून ऑनलाइन पद्धतीने कामाची संधी आहे,' असे आमिष दाखवून सायबर चोरट्यांनी कात्रज भागातील एका महिलेची १४ लाख २५ हजार रुपयांची फसवणूक केली. याप्रकरणी चोरट्यांविरुद्ध आंबेगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याबाबत एका महिलेने आंबेगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार महिला आंबेगाव खुर्द परिसरात राहायला आहेत. सायबर चोरट्यांनी त्यांना गेल्या वर्षी संदेश पाठविला होता.




'ऑनलाइन पद्धतीने घरातून काम केल्यास दररोज दोन ते तीन हजार रुपये मिळतात. समाज माध्यमातील चित्रफिती, तसेच मजकुरास प्रेक्षक पसंती मिळवून दिल्यास चांगला परतावा मिळेल,' असे आमिष दाखवून चोरट्यांनी महिलेला जाळ्यात ओढले. त्यानंतर चोरट्यांनी महिलेला ऑनलाइन काम (ऑनलाइन टास्क) दिले. महिलेने काम पूर्ण केल्यानंतर चोरट्यांनी तिला परताव्यापोटी चार हजार ९२० रुपये दिले. त्यामुळे महिलेचा विश्वास बसला. ऑनलाइन टास्कमध्ये आणखी रक्कम गुंतविल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष दाखवून चोरट्यांनी महिलेला जाळ्यात ओढले. महिलेने चोरट्यांच्या बँक खात्यात गेल्या सात ते आठ महिन्यांत वेळोवेळी १४ लाख २५ हजार रुपये गुंतविले. पैसे गुंतविल्यानंतर चोरट्यांनी महिलेला परतावा मिळाला नाही. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर महिलेने नुकतीच पोलिसांकडे तक्रार दिली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक शरद झिणे तपास करत आहेत.'शहरात ऑनलाइन टास्कच्या आमिषाने फसवणुकीचे गुन्हे वाढीस लागले आहेत. चोरट्यांनी सामान्यांना आमिष दाखवून आतापर्यंत कोट्यवधी रुपयांची फसवणूक केली आहे. चोरट्यांच्या बतावणीकडे दुर्लक्ष करा,' असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.'ऑनलाइन पद्धतीने घरातून काम केल्यास दररोज दोन ते तीन हजार रुपये मिळतात. समाज माध्यमातील चित्रफिती, तसेच मजकुरास प्रेक्षक पसंती मिळवून दिल्यास चांगला परतावा मिळेल,' असे आमिष दाखवून चोरट्यांनी महिलेला जाळ्यात ओढले. त्यानंतर चोरट्यांनी महिलेला ऑनलाइन काम (ऑनलाइन टास्क) दिले. महिलेने काम पूर्ण केल्यानंतर चोरट्यांनी तिला परताव्यापोटी चार हजार ९२० रुपये दिले. त्यामुळे महिलेचा विश्वास बसला. ऑनलाइन टास्कमध्ये आणखी रक्कम गुंतविल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष दाखवून चोरट्यांनी महिलेला जाळ्यात ओढले. महिलेने चोरट्यांच्या बँक खात्यात गेल्या सात ते आठ महिन्यांत वेळोवेळी १४ लाख २५ हजार रुपये गुंतविले. पैसे गुंतविल्यानंतर चोरट्यांनी महिलेला परतावा मिळाला नाही. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर महिलेने नुकतीच पोलिसांकडे तक्रार दिली.

### चोरट्यांच्या बतावणीकडे दुर्लक्ष

आमिषाने फसवणुकीचे गुन्हे वाढीस लागले आहेत. चोरट्यांनी सामान्यांना आमिष दाखवून आतापर्यंत कोट्यवधी रुपयांची फसवणूक केली आहे. चोरट्यांच्या बतावणीकडे दुर्लक्ष करा'घरातून ऑनलाइन पद्धतीने कामाची संधी आहे,' असे आमिष दाखवून सायबर चोरट्यांनी कात्रज भागातील एका महिलेची १४ लाख २५ हजार रुपयांची फसवणूक केली.

## 450 एकरांत साकारणार 701 कोटींचा प्रकल्प

# आळंदीत आंतरराष्ट्रीय ज्ञानपीठ उभारणार!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**प्राचीन भागवत धर्मातील सनातन आणि कल्याणकारी विचार जगभरात पोहोचविण्यासाठी आळंदी येथे साडेचारशे एकर जागेत जगाला हेवा वाटेल असे संत ज्ञानेश्वर महाराज ज्ञानपीठ उभारण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. दरम्यान या ज्ञानपीठासाठी 701 कोटी रुपयांचा खर्च असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी नमूद केले.**



आळंदी येथे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जन्मोत्सव सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाला ह.भ.प. शांतीब्रम्ह गु. मारुती महाराज कुरेकर, आमदार उमा खापरे, शंकर जगताप, बाबाजी काळे, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश महेंद्र महाजन, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, पीएआरडीएचे मुख्य कार्यकारी अधिकारी योगेश म्हसे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीचे प्रमुख विश्वस्त ॲड. राजेंद्र उमाप, डॉ. भावार्थ देखणे, योगी निरंजन नाथ, ॲड. रोहणीताई पवार, पुरुषोत्तम पाटील आदी उपस्थित होते. ज्ञानपीठ आपल्या हातून व्हावे ही ईश्वराची योजना असावी आणि त्याचे समाधानाही असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ज्ञानपीठ तयार करण्यासाठी 701 कोटी रुपयाचा आराखडा तयार करण्यात आला आहे. ज्ञानपीठाच्या माध्यमातून भारतीय अध्यात्मिक परंपरेतील मानवी कल्याणाचा शाश्वत विचार जगभरात जाईल. इंद्रायणी नदीचा विकास आराखडा तयार करण्यात आला होता. हा आराखडा सर्व मान्यता घेऊन केंद्र सरकारकडे पाठविण्यात आला आहे.

लवकरच तो मंजूर करून घेण्यात येईल. याद्वारे पिंपरी-चिंचवड महानगर पालिकेसह 39 गावातील पाणी शुद्ध करून इंद्रायणीत जाईल. इंद्रायणी नदीचे जल स्वच्छ, निर्मळ आणि पुजनीय होईल असा प्रयत्न करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यांनी दिली.

### 'नमो ज्ञानेश्वरा' ग्रंथाचे प्रकाशन

श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या समग्र वाङ्मयाचा साक्षेपी चिंतनात्मक आढावा घेणाऱ्या 'नमो ज्ञानेश्वरा' या ग्रंथाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. तसेच याच पुस्तकाच्या ऑडिओ बुकचे अनावरणही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले.या सोहळ्यात अन्नदान करणाऱ्या जगताप कुटुंबियांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

---

## बेगानी शादी में माझा अब्दुल्ला दीवाना का करता?

## दोन्ही राष्ट्रवादी एकत्रीकरणावर मुख्यमंत्री फडणवीसांचा टोला!

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येतील का? यावर तुम्ही सुप्रियाताई किंवा अजित पवारांना विचारा, यात "बेगानी शादी में माझा अब्दुल्ला दीवाना का करता?" असे उत्तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आळंदी येथे दिले.**




संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली यांच्या 750 व्या जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी आळंदी येथे ज्ञानेश्वर माऊलीच्या संजीवन समाधीचं दर्शन घेतले. त्यानंतर ते माध्यमांशी बोलत असताना राष्ट्रवादी एकत्र येणार का या प्रश्नावर त्यांनी चांगलेच टोले लगावले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्रकारांनी विचारले, राष्ट्रवादी काँग्रेसचे (एसपी) अध्यक्ष शरद पवार यांनी केलेल्या एका वक्तव्यावरुन राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. उद्धव आणि राज ठाकरे महाराष्ट्राच्या राजकारणात आणि महाराष्ट्रासाठी एकत्र येण्याची चर्चा सुरू आहे. दुसरीकडे दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येणार का, यावर चर्चेचं गुऱ्हाळ सुरु झालं आहे. यावर मुख्यमंत्र्यांनी बेगानी शादी में माझा अब्दुल्ला दीवाना का

### संतांचे विचार रुजायला हवे

मुख्यमंत्री "माऊलींचे दर्शन घेऊन समाधान वाटत आहे. आपल्या संतांचे विचार या समाजात रुजायला हवे" अशी प्रतिक्रिया राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माऊलींचं दर्शन घेतल्यानंतर दिली.

### प्रत्येक जिल्ह्यात वॉर रूम

पाकिस्तान भारतावर करत असलेल्या हल्ल्याविषयी आम्ही योग्य खबरदारी घेतली आहे. प्रत्येक जिल्ह्यात आमचे वॉर रूम तयार आहेत आणि प्रत्येक जिल्ह्याला आम्ही योग्य ती मदत करत आहोत, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना दिली.




# हे वागणे 'पंतप्रधानां'ना कसे बरे चालते?

**सक्रिय सेवेतून निवृत्ती घेतल्यानंतर काही आयएएस आणि आयपीएस अधिकाऱ्यांनी देशातील वेगवेगळ्या राज्यांमधील राजभवनांवर वर्णी लावून घेतली आहे, यात आश्चर्य वाटावे असे काहीच नाही. या दोन्ही देश पातळीवरील सेवांमध्ये असलेल्या लोकांना त्यांच्या कामाचा भाग म्हणून सत्ताधारी तसेच विरोधी पक्षात असलेल्या राजकारण्यांशी जवळजवळ रोजच संवाद साधावा लागतो.**

१९५३ मध्ये मी जेव्हा आयपीएस सेवेत दाखल झालो तेव्हा प्रशिक्षणादरम्यान आम्हाला समजले की सत्ताधाऱ्यांनी आखून दिलेल्या धोरणांचे कायद्याच्या चौकटीत राहून पालन करणे हे आयएएस आणि आयपीएस अधिकाऱ्यांचे काम असते. निवडून आलेले खासदार आणि आमदार अनुक्रमे पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांची निवड करतात. हे पंतप्रधान आणि मुख्यमंत्री विविध विभागांचे काम करण्यासाठी आपापल्या मंत्रिमंडळात मंत्र्यांची निवड करतात. कायद्यांच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवणे आणि त्यांच्या देखरेखीखाली असलेल्या विभागांचे काम कार्यक्षमतेने चालते याची जनतेला खात्री देणे, हे या या मंत्र्यांचे काम असते. अधिकाऱ्यांकडून कायद्यांचे उल्लंघन होणार नाही किंवा ते कायद्याने दिलेल्या अधिकारांचा गैरवापर करणार नाहीत याची काळजी मंत्र्यांनी घेणे अपेक्षित होते.मुंबई प्रांतात ही व्यवस्था एखाद्या घड्याळाच्या काट्यासारखी



काम करत होती. नंतर भाषिक आधारावरील राज्य पुनर्रचनेनंतर हा प्रांत तीन भागांमध्ये विभागला गेला. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी हे नियम तसेच राहतील याची काळजी घेतली. आधी मुख्यमंत्री आणि नंतर केंद्रीय गृहमंत्री झालेल्या शंकरराव चव्हाण यांनी ते गृहराज्यमंत्री असताना एकदा मला फोन केला होता. नांदेड जिल्ह्यातील त्यांच्या मतदारसंघातील एका गावात त्यांच्या काही अनुयायांनी विरोधी कम्युनिस्ट कार्यकर्त्यांना मारहाण केली होती. याबाबत काय करता येईल याबद्दल त्यांना सल्ला हवा होता.मी त्यांना सांगितले की, जिल्ह्याचा पोलिस अधीक्षक या नात्याने मी हिंसाचारात सहभागी असलेल्या गुन्हेगारांना अटक करून त्यांच्यावर गुन्हे नोंदले जातील हे पाहीन. सत्ताधारी पक्षाच्या लोकांना कायद्यानुसार कोणतीही सवलत नव्हती. मंत्रिमहोदयांनीही माझ्यावर दबाव आणण्याचा कोणताही प्रयत्न केला नाही. त्या काळी व्यवस्था अशा प्रकारे काम करत होती.

१९६० मध्ये ही घटना घडली तेव्हापासून परिस्थिती बरीच बदलली आहे. आता सत्ताधाऱ्यांना अशी अपेक्षा असते की त्यांच्या पक्षातील लोकांची चूक असतानाही पोलीस प्रमुखांनी त्यांची बाजू सावरून घ्यावी! अनेक आयपीएस अधिकारी सत्ताधाऱ्यांनी उपकृत केलेले असतात. या अधिकाऱ्यांचे लक्ष त्यांच्या करिअरवर असते आणि काही जणांचे जिथे सहज पैसे कमवता येतात अशा 'मलईदार' पोस्टिंगवर असते. राजकारण्यांनी आणि अधिकाऱ्यांनी एकमेकांची पाठ थोपटणे ही सुशासनासाठी वाईट गोष्ट आहे. आज आपल्या देशातील कायदा सुव्यवस्थेवर सतत दबाव असण्याचे हे मुख्य कारण आहे.निवृत्तीनंतर तमिळनाडूत राज्यपाल म्हणून नियुक्ती झालेले वादग्रस्त आयपीएस अधिकारी रवी यांच्याबद्दल मला पहिल्यांदा समजले, ते माझे मित्र प्रकाश सिंग यांच्या पुस्तकातून! मला आठवते की रवी गुप्तचर विभागामध्ये प्रकाश यांच्याकडे काम करत होते आणि माझा मित्र ज्या घटनेचा उल्लेख करत होता ती घटना नागालँडमध्ये घडली होती. रवि यांची निवड गुप्तचर विभागासाठी झाल्यानंतर तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांना अडचणीत आणणारे राज्यपाल म्हणून त्यांचं नाव देशभरातील सर्व वर्तमानपत्रांच्या पहिल्या पानावर झळकलं. तोपर्यंत त्यांच्याबद्दल फारसं काहीच माझ्या कानावर आलेलं नव्हतं. भाजपने त्यांना जाणूनबुजून विरोधी पक्षाच्या म्हणजेच जिथे भाजपची सत्ता नाही अशा राज्यात पाठवले होते हे स्पष्ट आहे. प्रत्येक राज्यात “डबल इंजिन” सरकार स्थापन करण्याचा आपला हेतू नरेंद्र मोदी यांनी कधीच लपवलेला नाही. त्यांना एकसंध शासनपद्धती अधिक सोयीची वाटते. स्टॅलिन, ममता बॅनर्जी आणि भगवंत सिंग मान यांच्यासारख्या मुख्यमंत्र्यांबरोबर काम करण्यापेक्षा त्यांना एकात्मक सरकार जास्त सोयीस्कर वाटते. केजरीवाल या दिल्लीच्या एकेकाळच्या मुख्यमंत्र्याचाही त्यांना सतत अडथळा वाटत होता. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत केजरीवालांच्या पक्षाची सत्ता हटवण्यात मोदींना यश मिळवले.

## प्रासंगिक »

### मर्कटबुद्धी-धुंदी...

***बेजबाबदार वृत्तांकनाची दखल सरकारला घ्यावी लागते; याला सर्वस्वी वृत्तवाहिन्या आणि वृत्तनिवेदकांचा वावदूकपणा कारणीभूत आहे...***

ऑपरेशन सिंदूर'अंतर्गत भारतीय सैन्यदलांनी ६ मे रोजीच्या मध्यरात्रीनंतर केलेल्या धाडसी कारवाईचे पडसाद अजूनही उमटत आहेत. या कारवाईने पाकिस्तानला गाफील पकडले. आपल्या कारवाईचे स्वरूप मर्यादित, संयमी तरी परिणामकारक असल्यामुळे पाकिस्तानची चरफड अधिक होत आहे.

ही चरफड आणि चिडचिड पाकिस्तानकडून गेले ३६ तास सुरू असलेल्या कृत्यांतून प्रतिबिंबित होते. ड्रोन आणि हलक्या क्षेपणास्त्रांद्वारे भारतीय लष्करी आस्थापनांना लक्ष्य केले गेले. हे सर्व हल्ले यशस्वीरीत्या परतावून लावण्यात आले आहेत. त्याबद्दल सरकार आणि सैन्यदलांचे अभिनंदन. जम्मू-काश्मीर सीमेवर पाकिस्तानी सैन्याने शस्त्रसंधी भंग करून तोफांचा मारा सुरू केला आहे.

जवाहरलाल नेहरू विद्यापीठ! भारतातील सुमारे ११०० विद्यापीठांपैकी एक. मात्र कायम चर्चेत असणारं! विद्यापीठांच्या जागतिक क्रमवारीमध्ये भारतातील क्रमांक एकचे विद्यापीठ ते राष्ट्रविरोधी विचारसरणीसाठी बदनाम अशा अनेक ओळखींनी व्यापलेले !

# जेएनयू – निवडणुका, चळवळ आणि व्यवस्था!

समाजमाध्यमांवर येथील विद्यार्थी, त्यांची विचारसरणी, राहणीमान, स्वातंत्र्याची संकल्पना, विद्यार्थी-विद्यार्थिनींची सामाजिक-आर्थिक-राजकीय आणि अगदी लैंगिक मते हा सामान्यांसाठी कुतूहलाचा आणि जल्पकांचा खिल्ली उडविण्याचा विषय! कोणत्याही सामाजिक घटकाची सर्वोच्च सार्वजनिक कृतिशीलता ही राजकीय क्षेत्रात दिसते. आणि राजकीय वर्तुळात निवडणूक ही सर्वोच्च गोष्ट मानली जाते.कोणत्याही समाज घटकाचे अथवा देशाचे मूल्यमापन करताना निवडणुकांची गुणवत्ता हा कळीचा मुद्दा ठरतो. त्यांवर त्या घटकाची सामाजिक, राजकीय आणि बौद्धिक परिपक्वता यांचे आकलन होण्यास मदत होते. जेएनयू हा सुमारे आठ हजार विद्यार्थ्यांचा एक शैक्षणिक-सामाजिक घटक! मात्र एखादी बातमी विद्यापीठाच्या कानाकोपऱ्यात पोहोचण्याआधी देशांतील प्रमुख माध्यमे व्यापतात. बऱ्याचदा विद्यार्थ्यांना



असा अनुभव येतो की आवारातील एखादी घटना त्यांच्यापर्यंत येण्याआधी दूरवर वसलेल्या त्यांच्या पालकांपर्यंत पोचलेली असते. एकूणच देशाच्या चर्चापटलावर जेएनयूची मागणी जास्त! त्यातच मागच्या आठवड्यात इथे निवडणुका झाल्या. डाव्यांचा गड मानल्या जाणाऱ्या या विद्यापीठात अभाविप या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अधिपत्याखालील विद्यार्थी संघटनेने केंद्रीय स्तरावर एक तर विभाग स्तरावर ४२ पैकी २३ जागांवर विजय मिळविला. निवडणुकांमध्ये केवळ जीत वा हार यावर केले जाणारे अवलोकन बऱ्याचदा अपुरे असते. जेएनयू निवडणुकांचे वेगळेपण अधोरेखित करण्याचा हा प्रयत्न!कोणत्याही निवडणुकांमध्ये वेगवेगळे दबाव गट काम करत असतात. विद्यापीठीय विद्यार्थी हा असाच एक दबाव गट! इतिहासात डोकावून पाहिल्यास भारताच्या आणि जगाच्या राजकारणात विद्यार्थ्यांनी महत्वाची भूमिका बजावली आहे. अमेरिकेच्या व्हिएतनाम संघर्षातील अमेरिकेच्या माघारीबद्दल चवीने चर्चा केली जाते. मात्र त्याच्या मागे १९६४ ते १९७२ दरम्यान कॅलिफोर्निया विद्यापीठाच्या बर्कले कॅम्पसमध्ये सुरू झालेल्या 'फ्री स्पीच मूव्हमेंट'चा दबाव होता. सरकारच्या दडपशाहीसाठी प्रसिद्ध आहेतच! भारताचा विचार करता १९७४ मध्ये गुजरातमध्ये नवनिर्माण आंदोलनाने जोर पकडला होता. अन्नधान्यांच्या वाढलेल्या किमती आणि भ्रष्टाचाराविरोधातील या आंदोलनामुळे गुजरातचे तत्कालीन मुख्यमंत्री चिमणभाई पटेल यांना राजीनामा द्यावा लागला.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# कोकण किनारपट्टीवर 'हाय अलर्ट'!

## रत्नागिरी पोलिसांच्या सूट्ट्या रद्द करून गस्त वाढविली

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारत-पाकिस्तानदरम्यान निर्माण झालेल्या युद्धजन्य तणावाच्या पार्श्वभूमीवर रत्नागिरी जिल्हा पोलीस प्रशासनाने सतर्कता वाढवली आहे. संपुर्ण जिल्ह्यात सतर्कतेचे आदेश देण्यात आले असून रत्नागिरी जिल्ह्याच्या समुद्र किनारपट्टीवर गस्त वाढविण्यात आली असल्याची माहिती जिल्हा पोलीस अधिक्षक धनंजय कुलकर्णी यांनी दिली आहे.**



भारत-पाकिस्तानदरम्यान निर्माण झालेल्या युध्दजन्य तणावाच्या पार्श्वभूमीवर रत्नागिरी जिल्हा पोलीस प्रशासनाने सतर्कता वाढवली आहे. संपुर्ण जिल्ह्यात सतर्कतेचे आदेश देण्यात आले असून रत्नागिरी जिल्ह्याच्या समुद्र किनारपट्टीवर गस्त वाढविण्यात आली असल्याची माहिती जिल्हा पोलीस अधिक्षक धनंजय कुलकर्णी यांनी दिली आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्यात आली असून, शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी पोलीस गस्त वाढवण्यात आली आहे. विशेषतः सागरकिनारी भागात गस्तीसाठी स्वतंत्र पथके कार्यरत करण्यात आली असून सागरी सुरक्षेसाठी नेमण्यात आलेल्या सदस्यांनाही अधिक सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. संशयित बोटी अथवा व्यक्ती आढळल्यास तत्काळ पोलिसांना कळविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील धार्मिक स्थळे, पर्यटनस्थळे, रेल्वे स्थानके, बाजारपेठा, तसेच सागरी सीमावर्ती भागांवर खास लक्ष ठेवण्यात येत असून, कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस विभाग सज्ज झाला आहे. नागरिकांनी कुठलीही संशयास्पद हालचाल, व्यक्ती किंवा वस्तू आढळल्यास तात्काळ ११२ या आपत्कालीन क्रमांकावर संपर्क साधावा किंवा जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.रत्नागिरी जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी ९ मे रोजी रात्री १२ वाजल्यापासून ते २३ मे २०२५ रोजीपर्यंत महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ चे कला २१०/१)(२) नुसार मनाई आदेश लागू करण्यात आले आहेत. तसेच जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणांना तयारीत राहण्याच्या सुचना करण्यात आल्या आहेत. भारत-पाकिस्तानदरम्यान निर्माण झालेल्या युध्दजन्य तणावाच्या पार्श्वभूमीवर रत्नागिरी जिल्हा पोलीस प्रशासनाने सतर्कता वाढवली आहे. संपुर्ण जिल्ह्यात सतर्कतेचे आदेश देण्यात आले असून रत्नागिरी जिल्ह्याच्या समुद्र किनारपट्टीवर गस्त वाढविण्यात आली असल्याची माहिती जिल्हा पोलीस अधिक्षक धनंजय कुलकर्णी यांनी दिली आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्यात आली असून, शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी पोलीस गस्त वाढवण्यात आली आहे. विशेषतः सागरकिनारी भागात गस्तीसाठी स्वतंत्र पथके कार्यरत करण्यात आली असून सागरी सुरक्षेसाठी नेमण्यात आलेल्या सदस्यांनाही अधिक सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. संशयित बोटी अथवा व्यक्ती आढळल्यास तत्काळ पोलिसांना कळविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील धार्मिक स्थळे, पर्यटनस्थळे, रेल्वे स्थानके, बाजारपेठा, तसेच सागरी सीमावर्ती भागांवर खास लक्ष ठेवण्यात येत असून, कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस विभाग सज्ज झाला आहे. नागरिकांनी कुठलीही संशयास्पद हालचाल, व्यक्ती किंवा वस्तू आढळल्यास तात्काळ ११२ या आपत्कालीन क्रमांकावर संपर्क साधावा किंवा जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

### संपुर्ण जिल्ह्यात सतर्कतेचे आदेश

रत्नागिरी जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी ९ मे रोजी रात्री १२ वाजल्यापासून ते २३ मे २०२५ रोजीपर्यंत महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ चे कला २१०/१)(२) नुसार मनाई आदेश लागू करण्यात आले आहेत. तसेच जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणांना तयारीत राहण्याच्या सुचना करण्यात आल्या आहेत.र्माण झालेल्या युध्दजन्य तणावाच्या पार्श्वभूमीवर रत्नागिरी जिल्हा पोलीस प्रशासनाने सतर्कता वाढवली आहे. संपुर्ण जिल्ह्यात सतर्कतेचे आदेश देण्यात आले असून रत्नागिरी जिल्ह्याच्या समुद्र किनारपट्टीवर गस्त वाढविण्यात आली असल्याची माहिती जिल्हा पोलीस अधिक्षक धनंजय कुलकर्णी यांनी दिली आहे.

# बोलायचे नसते, थेट ॲक्शन घ्यायची असते

## भारत-पाकिस्तान तणावावर पवारांची एका वाक्यात प्रतिक्रिया

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारताने ७ मे रोजी ऑपरेशन सिंदूर राबवून २२ एप्रिल रोजी झालेल्या पहलगाम हल्ल्याचा बदला घेतल्यानंतर पाकिस्तानचा जळफळाट झाला आहे. ८ मे पासून लागोपाठ तीन दिवस पाकिस्तानच्या लष्कराकडून भारतीय सीमेवरील राज्यांना लक्ष्य करण्यात येत आहे. जम्मू-काश्मीर ते गुजरातपर्यंत पसरलेल्या सीमेवर ड्रोन हल्ले, क्षेपणास्त्र डागणे आणि लढाऊ विमानांमधून ठिकठिकाणी हल्ले सुरू आहेत.**



क्षेपणास्त्र निकामी केले आहेत. या सर्व घडामोडींवर देशाचे माजी संरक्षण मंत्री शरद पवार यांना माध्यमांनी प्रश्न विचारला असता अनुभव शरद पवारांनी एक महत्त्वाची भूमिका मांडली.भारत आणि पाकिस्तान संदर्भात आंतरराष्ट्रीय पातळीवरून दोन्ही देशांना शांतता बाळगण्याचा आवाहन केले जात आहे. भारतानेही केवळ पहलगामच्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तान आणि पाकव्याप्त जम्मू-काश्मीरमधील दहशतवादी तळांना लक्ष्य केले. भारताने स्वतःहून नागरी भागांना लक्ष्य केले नाही. पण पाकिस्तान जाणूनबुजून नागरी भाग, रुग्णालये, शैक्षणिक संस्था, गुरुद्वारे यांना लक्ष्य करत त्यांच्यावर बॉम्ब टाकत आहे.माजी संरक्षण मंत्री शरद पवार यांना बारामतीमध्ये भारत-पाकिस्तान संघर्षावर प्रश्न विचारला असता ते म्हणाले, "यामध्ये जास्त बोलायचे नसते तर थेट ॲक्शन घ्यायची असते." शरद पवार यांच्या विधानातून भारतातील विरोधी पक्षांनी संयमीपणा दाखवत केंद्र सरकारला एकमताने पाठिंबा दिला असल्याचे दिसून येते. पाकिस्तानचे संरक्षण मंत्री, माजी मंत्री हे आंतरराष्ट्रीय माध्यमांना वारंवार मुलाखती देऊन भारताच्या नावाने गळे काढत आहेत. मात्र त्यांचा खोटारडेपणा रोजच्या रोज उघडा पडत आहे. दुसऱ्या बाजूला भारताकडून एकाही राजकीय नेत्याने माध्यमांना मुलाखती देऊन तणावावर भाष्य केलेले नाही. भारतीय लष्कर आणि परराष्ट्र मंत्रालयाकडून रोजच्या रोज पत्रकार परिषद घेऊन भारताची भूमिका अधिकृतपणे मांडण्यात येत आहे.

### काय म्हणाले शरद पवार?

शिवसेनेचे (ठाकरे) नेते संजय राऊत यांनी माध्यमांशी बोलत असताना भारत-पाकिस्तान तणावासाठी पाकिस्तानला जबाबदार धरले. "पाकिस्तान हा एक कमजोर लोकशाही असलेला देश आहे. त्यांची खरी सत्ता लष्कराकडे एकवटलेली असते. याधीही पाकिस्तानने कुरापती केलेल्या आहेत. मात्र आता ते उघडपणे हल्ले करत असून भारतीय लष्कराने त्याला चोख प्रत्युत्तर दिलेले आहे. त्यामुळे या विषयावर अधिक न बोललेले योग्य राहिल", असे संजय राऊत म्हणाले.अमेरिकेने भारत-पाकिस्तान तणावात हस्तक्षेप करण्यास नकार दिलेला आहे. त्यावर बोलताना संजय राऊत म्हणाले की, याबद्दल पंतप्रधान मोदींनी खरंतर राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्पना जाब विचारायला हवा. ट्रम्प यांच्या विजयासाठी पंतप्रधान मोदींनी प्रयत्न केले होते. खरेतर ट्रम्प यांनी पंतप्रधान मोदींच्या खांद्यावर हात टाकून त्यांना पाठिंबा द्यायला हवा होता.

# तर हा रक्तपात थांबला असता!

## शस्त्रविरामाच्या घोषणेनंतर ओमर अब्दुल्ला यांचं मोठं विधान

**।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**तीन दिवसांपासून सुरू असलेली भारत आणि पाकिस्तानमधील लष्करी कारवाई आता थांबली आहे. आज (१० मे) सायंकाळी ५ वाजल्यापासून शस्त्रविराम करण्यास दोन्ही देशांनी सहमती दर्शवली. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी याची माहिती दिल्यानंतर संरक्षण मंत्रालयानेही त्याला दुजोरा दिला. या घटनेनंतर जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी समाधान व्यक्त केले आहे.**

माध्यमांशी संवाद साधत असताना ओमर अब्दुल्ला म्हणाले, “शस्त्रविरामाची जी घोषणा झाली, त्याबद्दल मी मनापासून आभार व्यक्त करतो. उशीरा का होईना, पण चांगला निर्णय झाला. दोन-तीन दिवसांपूर्वी हा निर्णय घेतला असता तर आपल्याला जो रक्तपात पाहावा लागला, तो दिसला नसता. अनेक अमूल्य जीव आपण या दिवसांत गमावले. ते जीव वाचू शकले असते. पण अखेर पाकिस्तानच्या डिजीएमओंनी फोन उचलून आमच्या डिजीएमओंशी चर्चा केली आणि शस्त्रविराम प्रत्यक्षात आला.”आता जम्मू आणि काश्मीर सरकार जे जे नुकसान झाले, त्याचा आढावा घेईल. लोकांना नुकसान भरपाई दिली जाईल. जे लोक जखमी आहेत, त्यांच्यावर चांगला उपचार होईल. सरकारी योजनेच्या माध्यमातून त्यांना मदत करू. आज सकाळी घोषणा झाल्याप्रमाणे ज्यांचे मृत्यू झाले, त्यांनाही मदत दिली जाईल. मृतांना परत आणता येणार नाही, पण त्यांच्या कुटुंबियांना दुःखातून सावरण्याची प्रार्थना करू, असेही मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला म्हणाले.ओमर अब्दुल्ला पुढे म्हणाले की, जम्मू-काश्मीरचे खूप नुकसान झाले आहे. पण त्यात पूंछ जिल्ह्याला वाईट पद्धतीने फटका बसला आहे. राजौरी, तंगधारचे खूप नुकसान झाले. सर्व जिल्हा आयुक्तांना नुकसानाचा आढावा घेण्याचे आदेश दिले



आहेत. तसेच बऱ्याच दिवसांपासून विमानतळ बंद ठेवण्यात आले आहे. त्यामुळे हज यात्रेकरूंना पाठवता येत नव्हते. विमानतळ सुरू झाल्यानंतर यात्रेकरूंची पाठवणी करू.जम्मू आणि काश्मीर येथील पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यात सीमेवर धुमश्चक्री सुरू होती. ७ मे रोजी भारताने ऑपरेशन सिंदूर राबविल्यानंतर पाकिस्तानकडून जबर लष्करी कारवाईस सुरूवात झाली. जम्मू-काश्मीर ते गुजरातपर्यंतच्या सीमाभागात पाकिस्तानकडून ड्रोन, क्षेपणास्त्र हल्ले करण्यात आले. या हल्ल्यात अनेक निरपराध नागरिकांचे बळी गेले. तर भारतीय लष्कर आणि काही प्रशासकीय अधिकाऱ्यांनाही वीरमरण आले.माध्यमांशी संवाद साधत असताना ओमर अब्दुल्ला म्हणाले,“शस्त्रविरामाची जी घोषणा झाली, त्याबद्दल मी मनापासून आभार व्यक्त करतो. उशीरा का होईना, पण चांगला निर्णय झाला. दोन-तीन दिवसांपूर्वी हा निर्णय घेतला असता तर आपल्याला जो रक्तपात पाहावा लागला, तो दिसला नसता. अनेक अमूल्य जीव आपण या दिवसांत गमावले. ते जीव वाचू शकले असते. पण अखेर पाकिस्तानच्या डिजीएमओंनी फोन उचलून आमच्या डिजीएमओंशी चर्चा केली आणि शस्त्रविराम प्रत्यक्षात आला.”आता जम्मू आणि काश्मीर सरकार जे जे नुकसान झाले, त्याचा आढावा घेईल. लोकांना नुकसान भरपाई दिली जाईल. जे लोक जखमी आहेत, त्यांच्यावर चांगला उपचार होईल. सरकारी योजनेच्या माध्यमातून त्यांना मदत करू. आज सकाळी घोषणा झाल्याप्रमाणे ज्यांचे मृत्यू झाले, त्यांनाही मदत दिली जाईल. मृतांना परत आणता येणार नाही, पण त्यांच्या कुटुंबियांना दुःखातून सावरण्याची प्रार्थना करू, असेही मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला म्हणाले. ओमर अब्दुल्ला पुढे म्हणाले की, जम्मू-काश्मीरचे खूप नुकसान झाले आहे. पण त्यात पूंछ जिल्ह्याला वाईट पद्धतीने फटका बसला आहे. राजौरी, तंगधारचे खूप नुकसान झाले. सर्व जिल्हा आयुक्तांना नुकसानाचा आढावा घेण्याचे आदेश दिले आहेत. तसेच बऱ्याच दिवसांपासून विमानतळ बंद ठेवण्यात आले आहे. त्यामुळे हज यात्रेकरूंना पाठवता येत नव्हते.

### अनेक नागरिकांचे बळी गेले

तीन दिवसांपासून सुरू असलेली भारत आणि पाकिस्तानमधील लष्करी कारवाई आता थांबली आहे. विमानतळ सुरू झाल्यानंतर यात्रेकरूंची पाठवणी करू.जम्मू आणि काश्मीर येथील पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यात सीमेवर धुमश्चक्री सुरू होती. ७ मे रोजी भारताने ऑपरेशन सिंदूर राबविल्यानंतर पाकिस्तानकडून जबर लष्करी कारवाईस सुरूवात झाली. जम्मू-काश्मीर ते गुजरातपर्यंतच्या सीमाभागात पाकिस्तानकडून ड्रोन, क्षेपणास्त्र हल्ले करण्यात आले. या हल्ल्यात अनेक निरपराध नागरिकांचे बळी गेले.

# अमेरिकेच्या मध्यस्थीनंतर शस्त्रविराम?

## भारतानं पाकिस्ताननं केलेल्या खोट्या दाव्यांचा बुरखा फाडला

**।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**गेल्या चार दिवसांपासून भारत व पाकिस्तान यांच्यात चालू असलेली सीमेवरील धुमश्चक्री आता शांत झाली आहे. भारत व पाकिस्तान यांच्यात शस्त्रविरामासंदर्भात सहमती झाली असून आज शनिवार १० मे रोजी संध्याकाळी पाच वाजल्यापासून ही शस्त्रसंधी दोन्ही बाजूंनी लागू केली आहे. त्यामुळे सीमेवर दोन्ही बाजूंनी केली जाणारी कारवाई स्थगित झाली आहे.**

यासंदर्भात आता सोमवारी १२ मे रोजी दुपारी १२ वाजता भारत व पाकिस्तानचे DGMO अर्थात लष्करी कारवायांसदर्भातले



महासंचालक पुढील चर्चा करणार आहेत. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने आणि संरक्षण मंत्रालयाने घेतलेल्या पत्रकार परिषदेत ही माहिती देण्यात आली आहे.

मात्र, एकीकडे शस्त्रविराम झाला असला, तरी भारतानं पाकिस्तानच्या स्वभावाचा अंदाज घेऊन पत्रकार परिषदेतच सज्जड इशारा दिला आहे. संरक्षण मंत्रालयाने शस्त्रविरामानंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेत पाकिस्ताननं पुन्हा काही आगळीक केली तर त्याला सडेतोड प्रत्युत्तर देण्यासाठी भारतीय लष्कर सज्ज असल्याचं स्पष्ट केलं.या पत्रकार परिषदेत कर्नल सोफिया कुरेशी व विंग कमांडर व्योमिका सिंह यांच्यासोबत कमांडर रवी नायरदेखील उपस्थित होते. त्यांनी यावेळी भारतीय लष्कराची भूमिका स्पष्ट केली. “आम्ही आज झालेल्या शस्त्रविरामाचं पालन करू. पण आम्ही पूर्णपणे सज्ज राहू. कायम सतर्क असू. भारताचं सार्वभौमत्व आणि अखंडता कायम राखण्यासाठी आम्ही बांधील आहोत. आत्तापर्यंत पाकिस्तानकडून कोणत्याही प्रकारच्या आततायी कारवाईवर पूर्ण ताकदीनं भारतानं उत्तर दिलं आहे. यापुढेही जर असं काही पाऊल पाकिस्ताननं उचललं तर त्याला सडेतोड उत्तर दिलं जाईल. भारताच्या सुरक्षेसाठी यापुढेही जी काही मोहीम हाती घ्यावी लागेल, त्यासाठी आम्ही पूर्णपणे तयार असू”, असं त्यांनी स्पष्ट केलं आहे.

### पाकिस्तानचे खोटे दावे केले उघड

राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दोन्ही देशांमध्ये शस्त्रविरामावर सहमती झाल्याची पोस्ट त्यांच्या एक्स अकाऊंटवर केली. “रात्रभर अमेरिकेच्या मध्यस्थीने सविस्तर चर्चा केल्यानंतर भारत व पाकिस्तानने पूर्णपणे व तातडीने शस्त्रविराम करण्यावर सहमती दर्शवल्याची घोषणा करताना मला आनंद होत आहे. यासाठी मी दोन्ही बाजूंचं अभिनंदन करतो”, असं ट्रम्प यांनी पोस्टमध्ये म्हटंल आहे.गेल्या चार दिवसांपासून भारत व पाकिस्तान यांच्यात चालू असलेली सीमेवरील धुमश्चक्री आता शांत झाली आहे. भारत व पाकिस्तान यांच्यात शस्त्रविरामासंदर्भात सहमती झाली असून आज शनिवार १० मे रोजी संध्याकाळी पाच वाजल्यापासून ही शस्त्रसंधी दोन्ही बाजूंनी लागू केली आहे.

# तुमचं सैन्य भीक मागतंय, देवोलीनाने युजरला दिलं उत्तर

पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी २६ पर्यटकांची हत्या केल्यानंतर भारतीय सुरक्षा दलांनी पाकिस्तानमधील दहशतवादी तळांना लक्ष्य केलं. ऑपरेशन सिंदूर अंतर्गत भारताने पाकिस्तानमधील ९ दहशतवादी तळं उद्ध्वस्त केली. त्यानंतर पाकिस्तान जम्मू-काश्मीर, पंजाब, राजस्थानमध्ये सीमेवर ड्रोन हल्ले करण्याचा सातत्याने प्रयत्न करत आहे. भारतीय सुरक्षा दलाने पाकिस्तानचे हल्ले उधळून लावले आहेत. सेलिब्रिटी सोशल मीडियावर भारतीय लष्कराचं कौतुक करत आहेत. अनेक सेलिब्रिटी सोशल मीडियावर पोस्ट करून भारतीय लष्कराचं कौतुक करत आहेत. टीव्ही अभिनेत्री देवोलीना भट्टाचार्जीने एक्सवर बऱ्याच पोस्ट केल्या आहेत. एका पाकिस्तानी युजरने देवोलीनावर टीका केली आणि तिला मुस्लीम पतीला सोडून दे असं सांगितलं. यानंतर देवोलीना चांगलीच भडकली आणि तिने या पाकिस्तानी युजरला सडेतोड उत्तर दिलं.पाकिस्तानी एक्स युजरने देवोलीनाला म्हटलं, "मी सर्व भारतीय निर्मात्यांना विनंती करतो की कृपया देवोलीनाला काही काम द्या. ती घरी बसून वेडी झाली आहे. ती द्वेष पसरवत आहे. मला तिची चाहती असल्याचा पश्चात्ताप होतो. ती घाणेरडी, वाईट बोलणारी आणि



मूर्ख आहे. जर तुम्हाला इस्लामचा इतकाच द्वेष असेल तर तुझ्या मुस्लीम नवऱ्याला सोडून दे."पा-किस्तानी युजरने मुस्लीम पतीला सोडून दे, असं म्हणणाऱ्या युजरला देवोलीनाने सुनावलं. "हाहाहा... आता याला माझ्या कामाची काळजी वाटत आहे, ज्यांचा स्वतःचाच काही भरोसा नाही. जा आणि तुझा देश व टेरर कॅम्प सांभाळ. दोन दिवसांत तुमचं सैन्य भीक मागत आहे. माझ्या पतीची काळजी करण्यात तुझं रक्त जाळू नकोस. तुझ्या देशात ज्या दहशतवाद्यांना पोसलंय, त्यांना भारत सरकारच्या स्वाधीन करा... बिचारे मला त्रासले आहेत," असं देवोलीनाने लिहिलं.'साथ निभाना साथिया' फेम देवोलीना भट्टाचार्जी सध्या रुपेरी पडद्यापासून दूर आहे. देवोलीनाने १४ डिसेंबर २०२२ रोजी शानवाज शेखशी लग्न केलं. शानवाज जिम ट्रेनर आहे. या दोघांना १८ डिसेंबर २०२४ रोजी मुलगा झाला.

## तुमच्या बरोबर झालंय का कधी असं?

चला हवा येऊ द्या' या कार्यक्रमातून घराघरात पोहोचलेल्या कुशल बद्रिकेने आपल्या विनोदाच्या अचूक टाइमने प्रेक्षकांच्या मनात अटळ स्थान निर्माण केलं आहे. त्याने आपल्या सहजसुंदर अभिनय आणि विनोदी शैलीच्या जोरावर मराठी सिनेसृष्टीत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यामुळे कुशलचा एक वेगळा चाहता वर्ग तयार झाला आहे. नुकतीच कुशलने व्हेलेंटाइन डेनिमित्ताने बायकोसाठी एक खास पोस्ट शेअर केली आहे. अभिनेत्याच्या या पोस्टने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे.अभिनेता कुशल बद्रिकेने बायको सुनयना बद्रिकेचा पोस्ट शेअर करत ही पोस्ट लिहिली आहे. "तुमच्या बरोबर झालंय का कधी असं? की एखादं माणूस आपल्या समोर येतं आणि जगात फक्त आपलंच घड्याळ स्लो मोशनमध्ये धावायला लागतं, न्यूटनने लावलेला गुरुत्वाकर्षणाचा शोध फाट्यावर मारून आपण तरंगूच लागतो एकदम.

## जुई संतापली

ठाण्यात मुक्या प्राण्यांच्या ग्रूमिंग सेशन सेंटरमध्ये कर्मचाऱ्याने एका श्वानाला मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. हा व्हिडिओ अनेक प्राणीप्रेमी संस्थांकडून व्हायरल करण्यात आला असून संबंधित कंपनी व कर्मचाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे. पाळीव प्राण्यांची शुश्रूषा करणाऱ्या सेंटरमधील हा धक्कादायक प्रकार पाहून कलाविश्वातील अनेक कलाकारांनी प्रतिक्रिया दिल्या आहेत. रितेश देशमुख पाठोपाठ अभिनेत्री जुई गडकरीने इन्स्टाग्राम पोस्ट शेअर करत घडल्या प्रकाराबद्दल संताप व्यक्त केला आहे."एका स्पा सेंटरमध्ये श्वानाला कर्मचाऱ्याने मारहाण केल्याचा व्हिडीओ सध्या मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. हा व्हिडीओ अतिशय अस्वस्थ करणारा आहे. मी तो व्हिडीओ पूर्ण पाहू देखील शकले नाही. मारहाण करणाऱ्या त्या मनोरुग्णाला देव चांगलीच शिक्षा करेल...ज्या हातांनी त्याने मुक्या जीवाला मारहाण केली ते हात काही दिवसांत काहीच कामाचे राहणार नाहीत. हा अत्याचार थांबवा, त्या कर्मचाऱ्याला अटक करून कठोर शिक्षा करा. मी आशा करते की, तो श्वान आता सुरक्षित असेल.



## शिवाच्या 'त्या' दृष्यावर नेटकरी चवताळले!

छोट्या पडद्यावर सध्या टीआरपीची जोरदार शर्यत सुरू आहे. 'झी मराठी'ने नुकत्याच दोन नव्या मालिका सुरू केल्या आहेत. पहिल्याच दिवशी तांत्रिक कारणाने प्रसारीत न झालेली मालिका शिवा ही मालिका मंगळवारी प्रसारीत झाली. मात्र, या मालिकेतील एक दृष्य सोशल मीडियावर चर्चेत आले आहे. या दृष्यावर नेटकऱ्यांनी 'झी मराठी'च्या मालिकेला ट्रोल करण्यास सुरुवात केली आहे. विशेष म्हणजे हे दृष्य झी मराठीने आपल्या सोशल मीडिया हँडलवर पोस्ट केले आहे. मालिकेच्या या एपिसोडमध्ये आशुने दिव्याला इम्प्रेस करण्यासाठी हातात विषारी साप पकडल्याचं दाखवलं आहे. वीएफएक्सच्या माध्यमातून हा साप दाखवण्यात आला आहे. मात्र, त्यावर नेटकऱ्यांनी त्याची थट्टा उडवण्यास सुरुवात केली आहे.झी मराठीने पोस्ट केलेल्या शिवा मालिकेतील या दृष्यावर नेटकऱ्यांनी टीकेची झोड उठवण्यास सुरुवात केली आहे. एका युजरने कार्टून दाखवताय का लहान मुलांना? असा सवाल केला आहे. तर आणखी एका युजरने 'कार्टून पण यापेक्षा चांगल दाखवतात, असे म्हणत मालिकेतील व्हीएफएक्सच्या दर्जावर प्रश्न उपAस्थित केले. एका युजरने 'सातव्या मुलीची सातवी मुलगी'मधला नाग आता झीवरच्या इतर सगळ्या मालिकांमध्ये वापर करणार वाटतं, असे म्हटले. तर, काहींनी जुन्या मालिकाच दर्जेदार असल्याचे म्हटले. एका युजरने 'काय फालतू मालिका आहे, बंद करा काहीही दाखवतात', अशी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. 'शिवा' ही मालिका ही ओडिया मालिका 'सिंदूरा बिंदू' या मालिकेचा रिमेक आहे. ही मालिका 'मीत' या नावाने हिंदीत प्रसारीत झाली होती. मात्र, या मालिकेतील एक दृष्य सोशल मीडियावर चर्चेत आले आहे. या दृष्यावर नेटकऱ्यांनी 'झी मराठी'च्या मालिकेला ट्रोल करण्यास सुरुवात केली आहे.



## एकल पालकत्वाबद्दल मानसीची प्रतिक्रिया

अभिनेत्री अमृता देशमुख आणि प्रसाद जवादे यांचा लग्नसोहळा १८ नोव्हेंबर २०२३ रोजी थाटामाटात पार पडला. या जोडप्याच्या लग्नाला जवळच्या नातेवाईकांसह अनेक मराठी कलाकारांनी हजेरी लावली होती. लग्नानंतरचा प्रत्येक सण प्रसाद-अमृता मोठ्या उत्साहाने साजरा करत आहेत. नुकतीच अभिनेत्रीने तिच्या लग्नानंतरच्या पहिल्या हळदी-कुंकू समारंभाची झलक चाहत्यांबरोबर शेअर केली.अमृताने हळदी-कुंकू समारंभासाठी खास पारंपरिक लूक केला होता. गळ्यात नाजूक असा हार, साधं अन् सुंदर मंगळसूत्र, केसात गजरा, नाकात गोलाकार नथ आणि या शृंगाराला शोभेल अशी गुलाबी रंगाची साडी अभिनेत्रीने नेसली होती. याशिवाय अमृताने परिधान केलेलं हल्यावाचं मंगळसूत्र यामध्ये विशेष उठून दिसत होतं.अभिनेत्री ही पोस्ट शेअर करत लिहिते, "घरचं हळदी कुंकू...मी थकुन बसले होते... ही माहेरची साडी आहे. कारण, अखिल भारतीय नाट्य परिषद, जळगाव...यांनी मला ती खास 'खान्देश कन्या' म्हणून भेट दिली आहे. या साडीवर खास ही आगळी वेगळी नथ डिझाइन करून घेतली आहे."दरम्यान, अमृताच्या या सुंदर लूकवर नेटकऱ्यांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. अभिनेत्रीचा हा मराठमोळा लूक प्रत्येकाच्या पसंतीस उतरला आहे. तिचा पती अभिनेता प्रसाद जवादेने देखील बायकोच्या हळदी-कुंकू समारंभातील काही फोटो इन्स्टाग्रामवर शेअर करत तिचं कौतुक केलं होतं.अभिनेत्री अमृता देशमुख आणि प्रसाद जवादे यांचा लग्नसोहळा १८ नोव्हेंबर २०२३ रोजी थाटामाटात पार पडला. या जोडप्याच्या लग्नाला जवळच्या नातेवाईकांसह अनेक मराठी कलाकारांनी हजेरी लावली होती. लग्नानंतरचा प्रत्येक सण प्रसाद-अमृता मोठ्या उत्साहाने साजरा करत आहेत.

# कोहलीला निवृत्त व्हायचं आहे का?

## » बीसीसीआयने कोहलीला फेरविचार करण्यास सांगितलं

। नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारतीय क्रिकेटमध्ये येत्या काही दिवसांत मोठे बदल होणार आहेत. भारतीय संघातील स्टार फलंदाज रोहित शर्मने इंस्टाग्रामवर स्टोरी शेअर करून निवृत्ती घेत असल्याची घोषणा केली आहे. रोहितने निवृत्तीची घोषणा केल्यानंतर आता विराट कोहलीने देखील कसोटी क्रिकेटमधून निवृत्त होण्याची इच्छा व्यक्त केली आहे. मात्र, बीसीसीआयने त्याला फेरविचार करण्यासाठी सांगितलं आहे.**



द इंडियन एक्स्प्रेसने दिलेल्या वृत्तानुसार,विराट कोहलीने कसोटी क्रिकेटला रामराम करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. याबाबत त्याने बीसीसीआयला कल्पना दिली आहे. मात्र, आगामी इंग्लंड दौरा पाहता बीसीसीआयने त्याला फेरविचार करण्यासाठी सांगितलं आहे. त्यामुळे आता विराट काय निर्णय घेणार हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.सध्या भारतात आयपीएल २०२५ स्पर्धेचा थरार सुरू आहे. मात्र, भारत-पाकिस्तान या दोन्ही देशातील तणावाची स्थिती पाहता ही स्पर्धा एक आठवड्यासाठी स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या स्पर्धेत विराट कोहलीची बॅट चांगलीच तळपली आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा संघ प्लेऑफमध्ये प्रवेश करण्याच्या उंबरठ्यावर आहे. तर विराट कोहली ऑरेंज कॅपच्या शर्यतीत आहे. विराटने या हंगामातील ११ सामन्यांमध्ये ५०५ धावा केल्या आहेत.आयपीएलआधी झालेल्या चॅम्पियन्स ट्रॉफीतही विराटने धावा केल्या. यावरून हे स्पष्ट होतंय की, विराट कोहली फॉर्ममध्ये आहे. मग फॉर्ममध्ये असताना विराट कोहलीने निवृत्तीचा निर्णय का घेतला? असा प्रश्न आता उपस्थित होऊ लागला आहे. टाईम्स ऑफ इंडियाने दिलेल्या वृत्तानुसार, रोहित शर्मने निवृत्ती घेतल्यानंतर आता शुबमन गिलकडे भविष्यातील कर्णधार म्हणून पाहिलं जात आहे. बीसीसीआयने आता माघार न घेता पुढे जाण्याचा निर्णय घेतला आहे. विराट कोहलीने पुन्हा एकदा भारतीय संघाचं नेतृत्व करण्याची इच्छा व्यक्त केली होती. मात्र, बीसीसीआयने यावर विचार केला नव्हता. कारण बीसीसीआयला पुढील वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप स्पर्धा पाहता पूर्णवेळ कर्णधार हवा होता.इंग्लंडचा दौरा हा भारतीय संघासाठी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा असणार आहे. त्यामुळे विराट कोहलीसारखा अनुभवी खेळाडू संघात असणं अतिशय गरजेचं आहे. संघात केएल राहुल, ऋषभ पंत, शुबमन गिल आणि यशस्वी जयस्वालसारखे खेळाडू आहेत ज्यांना इंग्लंडमध्ये फारसा खेळण्याचा अनुभव नाही. तर दुसरीकडे असं देखील म्हटलं जात आहे की, पुढील महत्वाच्या स्पर्धा आणि मालिका पाहता गौतम गंभीरला युवा खेळाडूंचा संघ हवा आहे. यापूर्वी ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर विराट कोहलीची बॅट शांत राहिली होती. त्याला ५ सामन्यांमध्ये अवघ्या १९० धावा करता आल्या होत्या. यादरम्यान पहिल्यात सामन्यात त्याने शतकी खेळी केली होती. उर्वरीत सामन्यांमध्ये मिळून त्याला अवघ्या ९० धावा करता आल्या होत्या. ही सुमार कामगिरी पाहता त्याने तेव्हाच निवृत्तीचा निर्णय घेतला होता, असंही म्हटलं जात आहे. आता विराट आपला निर्णय मागे घेणार का? त्याला आपला निर्णय बदलण्यास भाग पाडणार का?

### निवृत्तीचा निर्णय का घेतला?

द इंडियन एक्स्प्रेसने दिलेल्या वृत्तानुसार,विराट कोहलीने कसोटी क्रिकेटला रामराम करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. याबाबत त्याने बीसीसीआयला कल्पना दिली आहे. मात्र, आगामी इंग्लंड दौरा पाहता बीसीसीआयने त्याला फेरविचार करण्यासाठी सांगितलं आहे. त्यामुळे आता विराट काय निर्णय घेणार हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.सध्या भारतात आयपीएल २०२५ स्पर्धेचा थरार सुरू आहे. मात्र, भारत-पाकिस्तान या दोन्ही देशातील तणावाची स्थिती पाहता ही स्पर्धा एक आठवड्यासाठी स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या स्पर्धेत विराट कोहलीची बॅट चांगलीच तळपली आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा संघ प्लेऑफमध्ये प्रवेश करण्याच्या उंबरठ्यावर आहे. तर विराट कोहली ऑरेंज कॅपच्या शर्यतीत आहे. विराटने या हंगामातील ११ सामन्यांमध्ये ५०५ धावा केल्या आहेत.आयपीएलआधी झालेल्या चॅम्पियन्स ट्रॉफीतही विराटने धावा केल्या. मग फॉर्ममध्ये असताना विराट कोहलीने निवृत्तीचा निर्णय का घेतला? असा प्रश्न आता उपस्थित होऊ लागला आहे.

---

# स्पर्धा स्थगित करण्यात आलेली नाही

## » बीसीसीआयला उर्वरीत सामने इंग्लंडमध्ये खेळवण्याची ऑफर

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारत- पाकिस्तान या दोन्ही देशातील वाढता तणाव पाहता बीसीसीआयने मोठा निर्णय घेतला आहे. आयपीएल २०२५ स्पर्धा एक आठवड्यासाठी स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. गुरूवारी पंजाब किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स या दोन्ही संघांमध्ये सामना होणार होता.**



मात्र, हा सामना सुरक्षेच्या कारणास्तव रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. धरमशालेतील हा सामना रद्द झाल्यानंतर, खेळाडूंना स्पेशल वंदे भारत एक्स्प्रेस ट्रेनमधून दिल्लीत आणण्यात आलं. आता परदेशी खेळाडूंनी मायदेशी जाण्याची वाट धरली असल्याचं म्हटलं जात आहे. आयपीएल स्पर्धा पूर्णपणे स्थगित करण्यात आलेली नाही . भारत – पाकिस्तानातील तणावाची स्थिती पाहता ही स्पर्धा केवळ १ आठवड्यासाठी स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे ही स्पर्धा पुन्हा एकदा सुरू होऊ शकते. खेळाडूंना सुरक्षित जागी पोहोचवण्यासाठी बीसीसीआय प्रयत्नशील आहे. माध्यमातील वृत्तानुसार, काही संघातील खेळाडू आणि सपोर्ट स्टाफमधील सदस्य मायदेशी परतले आहेत. त्यामुळे आयपीएल पुन्हा एकदा सुरू झाली, तर हे खेळाडू परत येणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.माध्यमातील वृत्तानुसार, बीसीसीआयने फ्रँचायझींना आधीच कल्पना दिली आहे की, खेळाडूंना एक आठवड्यानंतर आयपीएल खेळण्यासाठी तयार ठेवावं. यावरून हे तर स्पष्ट होत आहे की, बीसीसीआयने परदेशी गेलेल्या खेळाडूंना एका आठवड्यात भारतात यावं लागेल अशा सुचना दिल्या आहेत. मात्र, याबाबत कुठलीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. ज्यावेळी पंजाब आणि दिल्ली यांच्यातील सामना रद्द करण्यात आला, त्यावेळी असं म्हटलं गेलं होतं की, ही स्पर्धा अनिश्चित काळासाठी स्थगित करण्यात आली आहे. मात्र, त्यानंतर बीसीसीआयने आपल्या प्रेस रिलीझमध्ये सांगितले की, ही स्पर्धा एक आठवड्यासाठी स्थगित करण्यात आली आहे. मात्र, स्पर्धा पुन्हा केव्हा सुरू होणार? स्पर्धा कुठे होणार? याबाबत कुठलीही माहिती समोर आलेली नाही. आयपीएल स्पर्धेत एकूण ७४ सामने खेळवले जाणार आहेत. स्पर्धा स्थगित होण्यापूर्वी ५८ सामने पूर्ण झाले आहेत. अजूनही १६ सामने शिल्लक आहेत.

### स्पर्धा पुन्हा केव्हा सुरु होणार?

इंग्लंड क्रिकेट बोर्डने बीसीसीआयला उर्वरीत सामने इंग्लंडमध्ये खेळवण्याची ऑफर दिली आहे. भारत- पाकिस्तान या दोन्ही देशातील वाढता तणाव पाहता बीसीसीआयने मोठा निर्णय घेतला आहे. आयपीएल २०२५ स्पर्धा एक आठवड्यासाठी स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046


ADMISSION OPEN
Moraya Shikshan Sanstha
“यत् भावो – तत् भवति”
Computer 15 days Crash Course
Our Courses
> PowerPoint with animation
> Basic Excel
> Corel Draw
> Adobe Photoshop
> Scratch Animation
> ‘C’ Language
> Basic Java
> Basic Tally
From
5th May 2025
1 Hour / day
Monday to Saturday
Contact
8087706100
Registration started
Venue: Computer Lab,
V. K. Mate Highschool


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Swami Vivekanand Shikshan Prasarak Mandal's
GAYATRI GROUP OF SCHOOLS,
PUNE
ADMISSIONS OPEN
2025-26
PRE-PRIMARY
TO
HIGHER-SECONDARY
For more info
95277 64646 / 77967 67292